जा.क्र./नसका/स्थायी/सिआर-13/2019
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः- 25.11.2019

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**स्थायी समितीच्या सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड चे प्रकरण-2 मधील नियम क्र. 3 (अ) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र.3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **दिनांक 26.11.2019 रोजी दुपारी 03.00** वाजता नांवाशमनपा स्थायी समिती सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**(खान फारुख अली इलीयाज खान)**
**सभापती,**
**स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड.

**प्रति,**
**श्री / श्रीमती ------------------------------------------**
**सदस्य / सदस्या, स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**विषय क्रं. 01**

दिनांक 09.09.2019 रोजी मागील झालेल्या स्थायी समितीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत

**विषय क्रं. 02**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत झोन क्रं. 02 व 03 अंतर्गत मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती करणे या कामासाठी निविदा मागविण्यात आली असता सदरील कामासाठी 04 निविदा प्राप्त झाली त्या मध्ये मो. अजीम अब्दुल अजीज नांदेड व मे. एल अन्ड एस कन्सट्रक्शन नांदेड यांचे दर सारखेच असल्याने दोन्ही कंत्राटदारास वाटाघाटीसाठी बोलविले असता कंत्राटदार एल अन्ड एस कन्सट्रक्शन यांनी दर कमी करण्यास नकार दिली आहे. सदरील निविदा अंदाजपत्रक दरापेक्षा (-0.99%) कमी दराची आहे दर कमी करण्यासाठी दुस-या निविदाधारक **मो. अजीम अ. अजीज** यांनी (-0.99%) कमी दरा ऐवजी त्यांचे लेखी पत्र दिनांक 02.08.2019 अन्वये अंदाजपत्रक दरापेक्षा 1% कमी करण्यास तयार असल्याचे लेखी समंती दिली आहे. **करिता संबंधीतांची 1% कमी दराची निविदा रुपये 29,69,903/- ची निविदा मंजुरीसाठीचाच प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.**

**विषय क्रं. 03**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मार्फत चालविण्यात येणा-या डॉ. राम मनोहर लोहिया मुख्य वाचनालय, सर्व शाखा, सर्व स्पर्धा परिक्षा केंद्र व सर्व कॉर्नर वाचनालयासाठी वृत्तपत्रे / साप्ताहिके / पाक्षीके व मासिके ईत्यांदींची पुढील आर्थीक तिन वर्षासाठी खरेदी करण्यासाठी (दिनांक 01.04.2019 ते 31.03.2022) ई. निविदा सुचना (चौथ्यांदा) मागविण्यात आले असता फक्त एकच पुरवठाधारकांनी निविदा या कार्यालयास सादर केलेली असुन सदरील निविदाधारक श्रीपाद योगी न्युज पेपर एजन्सी नांदेड यांची एक निविदा प्राप्त झाली असुन संबंधीतांनी वृत्तपत्रे / साप्ताहिके / पाक्षीके व मासिके ईत्यांदींची छापिल किमंतीवर 05% सुट देत असल्याचे आपल्या लेखी पत्रानुसार कळविले असुन उपरोक्त तिन वर्षासाठी संबंधीतांची ई-निविदा सुचना मंजुर करुन वृत्तपत्रे / साप्ताहिके / पाक्षीके व मासिके ईत्यांदींची खरेदी करण्यासाठी लागणा-या खर्च अंदाजे रुपये 45.00 लक्ष (अक्षरी रुपये पंचेचाळीस लक्ष) फक्तची प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यासाठीचा प्रस्ताव मनपाकेच्या स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 04**

**विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावशमनपा हद्यीत पांडूरंगनगर गोविंदनगर येथील उर्वरीत नाल्याचे बांधकाम करणे रुपये 1,08,53,800/-

**संदर्भ :-** प्रशासकिय मान्यता जा.क्रं. 2017/नपाप्र/का-1/टे-4/सिआर-30 दिनांक 02.02.2018

नावाशमनपा हद्यीत पांडूरंगनगर, गोविंदनगर येथील उर्वरीत नाल्याचे बांधकाम करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय मान्यता दिल्यानुसार रुपये 1,08,53,800/- करिता दुस-यांदा ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/3017/

2019/ दिनांक 01.07.2019 अन्वये दैनिक दिव्यमराठी (राज्यस्तरीय) / दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय) / दैनिक गोदातीर या वृत्तपत्रात दिनांक 02.07.2019 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार फक्त 01 निविदा प्राप्त झाली प्रापत निविदा त्रिसदस्यीय समिती समोर दिनांक 26.07.2019 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | 39.00% जास्त दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 39.00% जास्त दराचे आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता संबंधीत कंत्राटदार प्रत्यक्ष उपस्थित राहुन लेखीपत्र देवुन सदर काम अदंाजपत्रकीय दरापेक्षा 39.00% जास्त दरा ऐवजी 33.00% दराने करण्याची लेखी समंती दिली आहे जे की प्रचलित जिल्हा दरसुची 2019-20 नुसार हे 0.79% कमी येत आहे.

करिता प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती सदर कामासाठी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 33.00% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव तसेच सदर काम या कामासाठीच्या मंजुर रक्कमेतुनच करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 05**

**विषय** – नाविन्यपुर्ण योजना नांदेड वाघाळा शहर महानगरपालका हद्यीत कापडी पिशव्या वापरण्याकरिता कॉटन ड्रिल कपडयाचा पुरवठा करणे कापडी पिशव्या शिवुन पुरवठा करणे व कापडी पिशव्यावर स्क्रीन प्रिंटींग करणे बाबत

संदर्भ – 1) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती नांदेड यांचे प्रशासकिय मान्यता व निधी वितरण आदेश क्रं. नियोजन/जिवायो/प्रमा.निवि/का-1/2017-18/436 दिनांक 05.03.2018

2) उज्वल टेक्सप्रिन्ट्रस सांगली यांचे पत्र दिनांक 26.08.2019

नाविन्यपुर्ण योजना अंतर्गत नांदेड शहर प्लास्टीक मुक्त करण्यासाठी कापडी पिशव्यांचा वापर करणेसाठी संदर्भ क्रं. 01 च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नांदेड यांनी जा.क्रं. नियोजन/जिवायो/प्रमा.निवि/का-1/2017-18/436 दिनांक 05.03.2018 अन्वये रुपये 99,95,000/- साठी प्रशासकिय मान्यता देवुन निधी वितरण केलेला आहे.

संदर्भ क्रं. 02 नुसार उज्वल टेक्सप्रिन्ट्रस सांगली यांनी नाविन्यपुर्ण योजना अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत कापडी पिशव्यासाठी कॉटन ड्रिल कपडयाचा पुरवठा करणे व पिशव्या शिवुन पुरवठा करण्याचे काम हे गिरीराज फाऊंडेशन नांदेड व गिरीराज सेल्स कार्पोरेशन नांदेड यांच्या मंजुर दरावर करण्यास कायम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे.

कंत्राटदार उज्वल टेक्सप्रिन्ट्रस सांगली जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सालसन 2017-18 नाविण्यपुर्ण योजने अंतर्गत तयार करण्यात आलेल्या पिशव्यांवर स्क्रिन प्रिंटींगचे काम करत आहेत.

नाविन्यपुर्ण योजना अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत कापडी पिशव्या वापरण्याकरिता कॉटन ड्रिल कपडयाचा पुरवठा करणेसाठी गिरीराज सेल्स कार्पोरेशन नांदेड यांना कामाचे कार्यारंभ आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/7852/2018 दिनांक 04.09.2018 व कापडी पिशव्या शिवुन पुरवठा करण्यासाठी गिरीराज फांडडेशन नांदेड यांना कार्यारंभ आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/7865/2018 दिनांक 04.09.2018 अन्वये देण्यात आले गिरीराज सेल्स कार्पोरेशन नांदेड यांची वाटाघाटी अंती नमुना क्रं. 01 साठी रुपये 49.00/- प्रती चौरस मिटर, नमुना क्रं. 02 साठी रुपये 45.00/- प्रति चौरस मिटर दर तसेच गिरीराज सेल्स कार्पोरेशन नांदेड यांचे वाटाघाटी अंती (1) 0.45 X 0.45 मी. साठी रुपये 4.90 प्रति विशपी (2) 0.45 X 0.30 मी. साठी रु. 3.40 प्रति पिशवी (3) 0.30 X 0.30 मी. साठी रुपये 3.20 प्रति पिशवी दर मंजुर करण्यात आले असुन संबधीतांनी आतापर्यंत 158678.13 पैकी 51841.06 चौ.मी. कापडाचा पुरवठा केला असुन 340950 पैकी 90153 पिशव्या शिवुन पुरवठा केल्या आहेत सदर तपशिलावरुन एकूण (106837.07) चौ.मी. कापडाचा पुरवठा तसेच (250797) पिशव्यांचा पुरवठा अद्याप करणे बाकी आहे. संबंधीतांकडून सदरचे काम अत्यंत संथ गतीने होत असुन या बाबत संबंधीतास रुपये 20,000/- दंड आकारण्यात आला आहे.

करिता उज्वल टेक्सप्रिन्ट्रस सांगली यांचे अर्जानुसार यापुर्वी मंजुर असलेल्या दरावर पिशव्यांचे कापड पुरवठा करणे व पिशव्या शिवुन देणे च्या कामास समर्थता दर्शविली असल्याने उज्वल टेक्सप्रिन्टस सांगली यांचेकडून सदर मंजुर दरावर काम करुन घेण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 06**

**विषय** :- मुलभुत सोयी सुविधा योजने मनपा हद्यीत अंबिकानगर मध्ये गर्जे यांचे घर ते मारोती मंदिर, नबलवार यांचे घर ते नागमवार यांचे घर, देशमुख यांचे घर ते चक्रवर्ती यांचे घर, देशपांडे यांचे घर ते डाखोरे यांचे घर, शिरसाठ यांचे घर ते देशमुख यांचे घर, डहाळे यांचे घर ते भालेराव यांचे घरा पर्यंत सि.सी. रस्ता करणे (रु. 38,00,000/-)

मुलभुत सोयी सुविधा योजने मनपा हद्यीत अंबिकानगर मध्ये गर्जे यांचे घर ते मारोती मंदिर, नबलवार यांचे घर ते नागमवार यांचे घर, देशमुख यांचे घर ते चक्रवर्ती यांचे घर, देशपांडे यांचे घर ते डाखोरे यांचे घर, शिरसाठ यांचे घर ते देशमुख यांचे घर, डहाळे यांचे घर ते भालेराव यांचे घरा पर्यंत सि.सि. रस्ता करणेसाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता दिल्यानुसार रुपये 38,00,000/- करिता ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/6209/2019 दिनांक 07.09.2019 अन्वये दैनिक लोकमत (राज्यस्तरीय) / दैनिक नगुशे उर्दु या वृत्तपत्रात दिनांक 08.09.2019 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमार दिनांक 18.09.2019 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर | |
|---|---|---|---|
| 01 | मे. आशा कन्सट्रक्शन नांदेड | अंदाजपत्रकीय दर | **L-1** |
| 02 | मे. सुरज एन्टरप्रायजेस नांदेड | 5.00% जास्त दर | **L-2** |

निविदाच्या तलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. आशा कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दराची आहे.

करिता सदर कामासाठी **मे. आशा कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर सादर.**

**विषय क्रं.** 07

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड जलशुध्दीकरण केंद्र येथे ब्लिचिंग पावडर पुरवठा करणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकाक हद्यीत जलशुध्दीकरण केंद्र येथे ब्लिचिंग पावडर पुरवठा करणे या कामासाठी एकूण 130 मे. टन ब्लिचिंग पावडर पुरवठा करण्याकरिता ई-निविदा सुचना ऑन लाईन मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा समितीसमोर उघडल्या असता मे. शामल केमीकल्स नांदेड यांची निविदा सर्वात कमी दराची असून ती रुपये 27,801/- प्रति मे. टन असून रुपये 36,14,130/- (अक्षरी रुपये छत्तीस लक्ष चौदा हजार एकशे तीस फक्त) असे दर प्राप्त झाले आहे सदरील दर कमी करण्यासाठी निविदा समितीने पुरवठा दारास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता सदरील पुरवठादाराने वाटाघाटी अंती दर कमी करुन रुपये 27,500/- प्रती मे. टन या दराने ब्लिचिंग पावडर पुरवठा करण्याची लेखी समंती दिली आहे.

करिता मे. शामल केमिकल्स नांदेड यांनी दर कमी करुन रु. 27,801/- प्रती मे. टन ऐवजी रु. 27,500/- प्रती मे. टन या प्रमाणे एकूण 35,75,000/- (अक्षरी रुपये पस्तीस लक्ष पंचाहत्तर हजार फक्त) एवढया किमंतीचा माल पुरवठा करण्यास अंदाजीत खर्चासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव मसुदा मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर

**विषय क्रं.** 08

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड जलशुध्दीकरण केंद्र येथे **PAC** पॉली अल्युमिनिअम पावडर पुरवठा करणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत जलशुध्दीकरण केंद्र येथे **PAC** पॉली अल्युमिनियम पावडर पुरवठा करणे या कामासाठी एकूण 100 मे. टन पुरवठा करण्याकरिता ई. निविदा सुचना ऑन लाईन मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा समिती समोर उघडल्या असता मे. एस.व्हि.एस. केमिकल्स कार्पोरेशन पुणे यांची निविदा सर्वात कमी दराची असुन ती रुपये 37,250/- प्रती मे. टन असुन रुपये 37,25,000/- (अक्षरी रुपये सदतीस लक्ष पंचवीस हजार फक्त) असे दर प्राप्त झाले आहेत सदरील दर कमी करण्यासाठी निविदा समितीने पुरवठा दारास वाटाघाटीलसाठी पाचारण केले असता सदरील पुरवठादाराने वाटाघाटी अंती दर कमी करुन रुपये 37,000/- प्रती मे. टन या दराने **PAC** पावडरचा पुरवठा करण्याची लेखी समंती दिली आहे.

करिता मे. एस.व्हि.एस. केमिकल्स कार्पोरेशन पुणे यांनी दर कमी करुन रुपये 37,250/- प्रती मे. टन ऐवजी रुपये 37,000/- प्रती मे. टन या प्रमाणे एकूण रुपये 37,00,000/- (अक्षरी रुपये सदतीस लक्ष फक्त) एवढया किमंतीचा माल पुरवठा करण्यास अंदाजीत खर्चासाठी प्रशासकीय व आर्थीक मान्यतेचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभे समोर सादर.

**विषय क्रं.** 09

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड जलशुध्दीकरणे केंद्र येथे तुरटी पुरवठा करणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत जलशुध्दीकरण केंद्र येथे तुरटी पुरवठा करणे या कामासाठी एकूण 400 मे. टन तुरटी पुरवठा करण्याकरिता ई-निविदा सुचना ऑन लाईन मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा निविदा समिती समोर उघडल्या असता मे. महाराष्ट्र केमिकल्स अन्ड जनरल सप्लायर्स नांदेड यांची निविदा सर्वात कमी दराची असून ती रुपये 19,751/- प्रती मे. टन असून रुपये 19,00,400/- (अक्षरी रुपये एकोनआंशी लक्ष चारशे फक्त) असे दर प्राप्त झाले आहेत सदरील दर कमी करण्यासाठी निविदा समितीने पुरवठा दारास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता सदरील पुरवठादाराने वाटाघाटी अंती दर कमी करुन रुपये 19,100/- प्रती. मे. टन या दराने तुरटी पुरवठा करण्याची लेखी समंती दिली आहे.

करिता मे. महाराष्ट्र केमिकल्स अन्ड जनरल सप्लायर्स नांदेड यांनी दर कमी करुन रुपये 19,751/- प्रती मे. टन ऐवजी रुपये 19,100/- प्रती मे. टन ऐवजी रुपये 19,100/- प्रती मे. टन या प्रमाणे एकूण रुपये 76,40,000/- (अक्षरी रुपये शहात्तर लक्ष चाळीस हजार फक्त) एवढया किमंतीचा माल पुरवठा करण्यास अंदाजीत खर्चासाठी प्रशासकीय व आर्थीक मान्यतेचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्रं. 10**

**विषय :-** राज्य नदी संवर्धन योजने अंतर्गत गोदावरी नदी संवर्धन प्रकल्प गोदावरी नदीचे उस्मानशाही नाला / चुनाल नालाव्दारे होणारे प्रदुषण प्रतिबंध करण्यासाठी मल:शुध्दीकरणे केंद्र उभारणे

राज्य नदी संवर्धन योजने अंतर्गत मल:शुध्दीकरण केंद्र उभारणी कामासाठी पर्यावरण विभाग शासन निर्णय क्रं. रानयो/ 2019/प्र.क्र.61/तां.क्रं.3 दिनांक 11.09.19 अन्वये एकूण किमंत रुपये 17,59,81,059/- इतक्या रक्कमेसप्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मंजुर रक्कमेपैकी 80% हिस्सा राज्य शासन व 20% हिस्सा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांचा राहील या अटीवर मान्यता प्रदान करण्यात आली आहे. यानुसार ई-टेंडर व्दारे रुपये 15,41,00,789/- इतक्या किमंतीची जीएसटी वचगळुन निविदा सुचना 6833/19 दिनांक 18.09.19 प्रसिध्द केली असता एकच निविदा प्राप्त झाली. त्यामुळे फेरनिविदा 8524/19 दिनांक 25.10.19 प्रसिध्द केली असता एकच निविदा प्राप्त झाली प्राप्त एक निविदा, निविदा समिती समोर उघडण्यात आली. तांत्रीक अर्हता तपासणी अंती निविदा समितीच्या अहवालानुसार प्राप्त निविदा मे. शारदा कन्सट्रक्शन अन्ड कार्पोरेशन प्रा.लि. नांदेड यांची निविदा किमंत रुपये 18,48,28,786-30 दिले होते. जास्तीच्या दराबाबत दर पृथकरण निविदा धारका सोबत करण्यात आले. दर पृथकरण अंती निविदा धारकांनी दिनांक 21.11.19 च्या लेखी समंती पत्रानुसार निविदा देकार हा रुपये 16,91,93,752/- ऐवढा सादर केला आहे. चालु दरसुचीनुसार निविदेची मुल्यांकित किंमत रुपये 16,17,84,043/- विचारात घेता निविदाधारकाचा देकार निविदेची मुल्यांकीत किमंत पेक्षा 4.58 टक्के जास्त येत आहे.

विषयांकित कामासाठी मे. शारदा कन्सट्रक्शन अन्ड कार्पोरेशन प्रा.लि. नांदेड यांची रुपये 16,91,93,752/- (अक्षरी रुपये सोळा कोटी एक्यान्नव लक्ष त्रयान्नव हजार सातशे बावन्न फक्त) किमंतीचे निविदा मंजुरीस मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रं. 11**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागासाठी विविध नदी घाटवर व कार्यक्रम प्रसंगी लावण्यात येणा-या जिवरक्षकांचे व ताराफयाचे दर निश्चित करणे बाबत

संदर्भ :- 1) दरपत्रक सुचना क्रं. नावाशमनपा/आव्यक/3587/19 दिनांक 12.07.19
2) वर्तमान पत्रातील जाहीर प्रगटन नांदेड टाईम्स उर्दु डेली दिनांक 13.07.19
3) संबंधीत संस्थांशी झालेली वाटाघाटी दिनांक 16.09.19
4) त्रिसदस्यीय समितीची मान्यता दिनांक 20.09.2019

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडच्या आपत्ती व्यवस्थापन केंद्रा अंतर्गत गोदावरी नदीकाठावर पावसाळयात, पुरजण्य परिस्थीतीत, दुर्गा विसर्जन, ई. कार्यक्रमासाठी वेळोवेळी लागणा-या जिवरक्षकांसाठी व तराफेंसाठीचे दर निश्चीत करणे बाबत सदर क्षेत्रात अनुभवी संस्थाकडून दरपत्रक मागवलेली होती. त्यानुसार (1) गोदावरी जिवरक्षक सेवाभावी संस्था नावघाट नांदेड (2) गंगापुत्र जिवरक्षक दल गाडीपुरा भाई गल्ली नांदेड (3) महागोदावरील जिवरक्षक दल व सेवाभासी संस्था नांदेड (4) गंगापुत्र मच्छिमार सहकारी संस्था म. नांदेड या चार संस्थांनी सारखेच दर म्हणजे प्रतिजिवरक्षक 500/- व प्रति तराफा 6000/- असे एकसारखेच दर दिलेले होते त्यामुळे चारही संस्थांना वाटाघाटीसाठी बोलावले असता वाटाघाटी अंती संबंधीत संस्थांनी प्रति जिवरक्षक प्रतिदिन 450/- व प्रतिकार्यक्रम प्रतितराफा 4000/- रुपये दरावर काम करण्याचे मान्य केलेले आहे त्यास त्रिसदस्यीय समितीने मान्यता दिलेली आहे.

करिता उक्त प्रमाणे चार संस्थांना जिवरक्षकांच्या उपलब्धतेनुसार आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी निघणारे जिवरक्षकांचे काम देण्यासाठी प्रति जिवरक्षक प्रतिदिन 450/- रुपये व प्रतिकार्यक्रम प्रतितराफा 4000/- रुपये दर पुढील आदेशापर्यंत मान्य करण्यासाठी स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर.

**विषय क्रं. 12**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत नविन कौठा, गट नं. 80 येथील प्रस्तावित महात्मा बसवेश्वर पुतळा परिसराचे सुशोभिकरण करणे बाबत

संदर्भ :- आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/5610/19 दिनांक 27.08.2019

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत नविन कौठा, गट नं. 80 येथील प्रसतावित महात्मा बसवेश्वर पुतळा परिसराचे सुशोभिकरण करणेसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्रं 115 दिनांक 30.11.2016 रोजी पारीत केला आहे. ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/5616/19 दिनांक 27.08.19 अन्वये दैनिक पुण्यनगरी

(राज्यस्तरीय) / दैनिक श्रमिक एकजुट या वृत्तपत्रात दिनांक 28.08.19 अन्वये निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 31.10.19 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर | |
|---|---|---|---|
| 01 | मे. एन.एस. शेट्टी नांदेड | 22.50% जास्त दर | L-1 |
| 02 | मे. हेंद्रे कन्सट्रक्शन नांदेड | 22.50% जास्त दर | L-2 |
| 03 | श्री राहुल गणेशराव बावगे नांदेड | 26.33% जास्त दर | L-3 |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार मे. एस.एन. शेट्टी नांदेड यांची निविदा कमी दराची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 22.50% जास्त दराची आहे सदरील दरामध्ये कंत्राटदाराने **GST** चा समावेश करुन दर सादर केले आहेत.

सदरील दर जास्तीचे वाटत असल्याने कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साबांवि/8783/2019 दिनांक 05.11.19 रोजी वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता संबंधीतांनी **GST** प्रचलित साहित्याचे बाजारभाव, रेतीचे वाहतुक / दर, रॉयल्टी व आर्किटेक्चरल इफेक्टस इत्यादी बाबी विचारात घेवुन दर सादर केले आहे. वाटाघाटी अंती संबंधीतांनी 22.50% जास्त दरा ऐवजी सदर काम स्थापत्य विषयक कामावर 12% **GST** व निविदा रक्कमेवर 7.00% जास्त दराने करण्याची लेखी सहमती दिली आहे.

करिता सदर कामासाठी मे. एन.एस. शेट्टी नांदेड यांची स्थापत्य विषयक कामावर 12% **GST** प्रमाणे रुपये 16,35,347/- व एकूण निविदा किमंतीवर 7.00% जास्त दर रुपये 10,37,703/- या प्रमाणे एकूण रक्कम रुपये 1,74,97,383/- साठी मंजुरीस्तव प्रशासकीय व आर्थीक मान्यतेस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभे समोर सादर.

**विषय क्रं. 13 अपिल दिनांक 06.11.19 प्राप्त दि. 15.11.19**

**प्रति,**
**मा. सभापती सहेब,**
**स्थायी समिती,**
**नावाशमनपानांदेड**

विषय :- निलंबन प्रकरणी शास्ती लावलेली रद्दबातल करुन दि. 16.02.17 ते 26.07.17 (161 दिवस) निलंबन काळ गृहीत धरुन सेवाकाळ धरण्यात यावा. नियमानुसार 12 वर्षाच्या कालावधीसाठी वेतनश्रेणी देण्यात यावी व इतर देय लाभ मंजुर करण्यात यावे

संदर्भ :- जा.क्रं. 16278 दिनांक 05.02.2019 अन्वये

महोदय,

वरील विषयी आपल्या सेवेत निवेदन सादर करण्यात येते की,

1) हे की, मला जा.क्रं. 16278 दिनांक 05.02.19 चे पत्र मिळाले आहे हया पत्राच्या खुलाशाबाबत आपल्या नावारशमनपा नांदेड येथे संबंधीत विभागात प्रतीउत्तर / जबाब घेउुन गेले असता 2019 मधील लोकसभा निवडणुकीसाठी सर्व संबंधीत कर्मचारी / अधिकारी व्यस्त असल्याचे सांगुन मला वारंवार परत करत राहीले लोकसभा निवडणूक झाल्यानंतर मी आपल्या कार्यालयात संबंधीतांकडे येऊन प्रत्यक्ष भेटले असता थांबा साहेब नाहीत आता विधानसभा निवडणूका लागत आहे असे कारणे सांगुन मला संदर्भीय पत्रास जाब / अपिल, उत्तर देण्यास या ना त्या कारणाने उशिर होत राहीला संदर्भीय निवेदनावर 30 दिवसात लेखी जबाब देणे गरजेचे असतांना आज पर्यंत झालेला उशिर मी जाणुनबुजून केलेला नाही.

तरीही मी लगेचच मा. आयुक्त प्रशासन यांच्याकडे दिनांक 18.02.19, 26.03.19 रोजी दोन वेळा निवेदने दिलेले आहेत म्हणजे अपिलांच्या संबंधीत प्रकार आहे म्हणजे माझ्याकडुन कोणताही उशिर झालेला नाही वरील संदर्भीय पत्रास माझे हे दोन अर्ज एक प्रकारे अपिलाचाच भाग आहे याचे आपल्यास्तरावर बारकाईने लक्ष न देता दुर्लघ केलेले आहे म्हणजे माझा त्यामध्ये कांहीही कसुर नाही.

2) हे की, मी नावाशमनपा नांदेउ अंतर्गत दिनांक 25.09.86 पासून जवळपास सलग 32 वर्ष शिक्षीका – मुख्याध्यापक या पदावर कर्तव्य बजावलेले आहे एवढया मोठा कालावधी सेवाकाळ असतांना मला 12 वर्षाची वेतनश्रेणी, 24 वर्षाची वेतनश्रेणी, इन्क्रीमेंट, इतर लाभ अद्याप दिलेले नाहीत हे सर्व लाभास मी माझ्या निलंबानापुर्वीच्या काळापुर्वीची पात्रताधारक आहे.

3) हे की, संदर्भीय पत्रास मी दिनांक 18.02.19 व 26.03.19 रोजी प्रतिउत्तर मा. आयुक्त साहेब नांदेड यांचेकडे देऊन, मुदतपुर्व उत्तर दिलेले असल्यामुळे संदर्भीय निवेदनातील निलंबन प्रकरणाची शास्ती रद्द करण्यात यावी आणि 12 व 24 वर्षाची वेतनश्रेणी, इन्क्रीमेंट, इतर देय लाभास मी पात्र असल्यामुळे ते तात्काळ देण्यात यावे.

4) हे की वरील प्रमाणे मी सलग 32 वर्ष सेवा केलेली आहे माझ्यावर अन्य होत असुन मानसीक, शारीरिक , आर्थीक त्रास होत आहे.

<u>तरी विनंती की</u>

1) संदर्भीय पत्रातील निलंबन प्रकरणीची शास्ती रद्दद करण्यात यावी.

2) संदर्भीय पत्रास मी मुदतपुर्व मा. आयुक्तांकडक दिनांक 18.02.19 व 26.02.3.19 रोजी पत्र देऊन मुदतीत पुर्तता केलेली आहे याचे अवलोकन व्हावे ही विनंती.

3) मला 12 व 24 वर्षाची वेतनश्रेणी इतर देयलाभ इन्क्रीमेंट इतर शासन नियमानुसार लाभ प्रदान करण्यात यावे हि विनंती.

**अर्जदार**
**स्वाक्षरीत/-**
**महामती गौतमी काशिराम हंकारे**
**सेवानिवृत्त प्रभारी मुख्याध्यापक**
**रा. पिवळी गिरणी, आशीर्वादनगर नांदेड**

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**(खान फारुख अली इलीयाज खान)**
**सभापती,**
**स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड.